# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संचालक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| प्रकाशक | : | सध्दर्म प्रकाशन |
| प्रकाशन वर्ष | : | १९८६ |
| वर्ष | : | एकविसावें |
| अंक | : | तिसरा |
| पृष्ठे | : | १६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७१**

Registered with the Registrar of News-pepers for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशित

# सद्धर्म

त्रै मा सि क

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वर्ष एकविसावें
अंक तिसरा
भाद्रपद : १९०८
ऑक्टोबर १९८६
वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान
दोन रुपये

## नेतृत्व मुखवट्यांचें

अकृत्वा निजदेशस्य रक्षां यो विजिगीषते ।
स नृपः परिधानेन वृतमौलिः पुमानिव ॥

शार्ङ्गधरपद्धति अ. १५

मी 'या माझ्या प्रजेचें, राज्याचें प्राणपणानें रक्षण करीन' अशी शपथ घेऊन सिंहासनावर आरूढ झालेला राजा जेव्हां राज्याचें पालन-रक्षण न करतां जगज्जेता होण्याचीं स्वप्नें पहात इतर राज्यांत लुडबुड करायला जातो तेव्हां त्याला आपल्या धर्मपत्नीला संतुष्ट न करतां, तिला फसवून परस्त्रीकडे जाणाऱ्या पुरुषाप्रमाणें तोंडावर बुरखा घ्यावा लागतो. खोटा मुखवटा धारण करावा लागतो.

आपलें घर, राज्य सांभाळूं न शकणारा राजा दुसऱ्यांचीं घरें-राज्यें काय सांभाळणार!

नेत्याच्या मुखवट्यानें नेतृत्व मिळत नसतें!

## या अंकांत....

| | | |
|---|---|---|
| १. मांगल्याचा आविष्कार | ... | २ |
| २. चौवीस नांवेंच कां ? | ... | ३ |
| ३. प्रपंच आणि अश्वत्थ | ... | ९ |
| ४. नमस्कार | ... | ११ |
| ५. अमृतकण कोवळे | ... | १४ |
| ६. सेवेची श्रुत होय | ... | १६ |

### कृपया....

१. मनिऑर्डर श्रीधर भालचंद्र आणि कंपनी कापडाचे व्यापारी, प्रार्थना समाज मुंबई ४ या पत्यावरच पाठवावी. मनी ऑर्डरचे कूपनवर आपला पूर्णपत्ता व पूर्णनांव अगत्यानें लिहावें. ग्राहक नवा की जुना याचा उल्लेख ही कृपया करावा.

२. देणगी शक्यतों चेकनें पाठवूं नये. पाठविणें अपरिहार्य असेल तर 'सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट' या नांवेंच चेक लिहावा.

# मांगल्याचा आविष्कार

मनुष्यमात्र हा मूलतः सत्प्रवृत्त आहे. संगतीनें तो बिघडतो. असत्प्रवृत्त होतो. आणि त्यामुळें त्याला दुःख, यातना भोगाव्या लागतात. 'पावको लोहसंगेन मुद्गरैरभिहन्यते' लोखंडाशीं मैत्री केल्यामुळें, सर्वांना पावन-शुद्ध करणाऱ्या पावकाला-अग्नीला घणाचे आघात सहन करावे लागतात. पण त्या अग्नीचा यज्ञीय हविर्द्रव्याशीं संयोग झाला तर तो वंदनीय, पूजनीय ठरतो.

व्यक्तिमात्राला संग, सहवास, मैत्री, संगत अपरिहार्य आहे. पण ती 'सम् गति' चांगली गति म्हणजे उत्कर्ष करणारी असली पाहिजे. मिळविली पाहिजे. ती मिळविली आणि विवेकभावें सांभाळली तर इहलोकीच स्वर्गीय अलौकिक सुख लाभतें. महर्षि वेदव्यास म्हणतात—

> तुलयाम लवेनाऽपि न स्वर्गं नाऽपुनर्भवम् ।
> भगवत्संगिसंगस्य मर्त्यानां किमुताऽऽशिषः । भागवत १।१८।१३

ईश्वरनिष्ठांच्या संगतीनें मिळणारें सुख आणि स्वर्ग किंवा मोक्ष मिळल्यानें होणारें सुख यांची तुलनाच करतां येणार नाहीं. (अपुनर्भव म्हणजे पुनर्जन्म प्राप्त न होणें म्हणजेच मोक्ष). ईश्वर-भक्तांच्या नुसत्या सहवासानें एवढें स्वर्ग-मोक्ष सुखापेक्षां अधिक सुख मिळतें, तर त्यांच्या आशीर्वादानें-अनुग्रहानें किती सुख मिळेल याचें काय वर्णन करावें !

संत तुलसीदास 'रामचरितमानसांत' म्हणतात—

> तात स्वर्ग अपवर्ग सुख धरिअ तुला इक अंग ।
> तुल न ताहि सकल मिलि जो सुखलव संग ॥

भगवद्भक्तांच्या क्षणभर सहवासांत-संगतीत लाभणारें सुख तराजूच्या एका पारड्यांत ठेवलें आणि दुसऱ्या पारड्यांत स्वर्गप्राप्तीनें मिळणारें सुख व मोक्षप्राप्तीमुळें मिळणारें सुख ठेवलें तर सत्संगतीनें लाभणाऱ्या सुखाचें पारडें खालींच राहील. दोघांची बरोबरी होणार नाहीं.

भगवंतावर अपार श्रद्धा असलेल्या भक्तांचा सहवास मनुष्यमात्राला सुख-शांति मिळवून देतो. सुखी, शान्त, मनुष्यच आपलें व आपल्या आप्तेष्टांचें कल्याण साधूं शकतो. व त्यामुळेंच सर्वत्र मांगल्याचा आविष्कार होतो ही वस्तुस्थिति, सर्वात्म परमेश्वराचा साक्षात्कार घडलेले ज्ञानदेव आपल्या अमृतरसाळ पसायदानांत स्पष्ट करतात—

> वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
> अनवरत भूतळीं । भेटतु भूतां ॥

सतत मांगल्याची अमृतमय वृष्टि करणारी भगवद्भक्तमंडळी या भूतलावर मनुष्यमात्राला अविरत भेटो.

श्रीमच्छंकराचार्यांनीं 'नेयं सज्जनसंगे चित्तम्' आपलें मन सदैव सज्जनांच्या—ईश्वरनिष्ठांच्या संगतींतच रममाण करा असें सांगितलें आहे.

या सर्वांचें सांगणें एकच, ईश्वरावर निष्ठा ठेवा. ती निष्ठा ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीच्या संगतीनें दृढ होईल. त्यामुळें तुम्हांला चैतन्यमय आनंदमय परमेश्वराचा साक्षात्कार होईल आणि तुमचें जीवन मांगल्यानें बहरून जाईल.

# चौवीस नांवेंच कां?

'मंगलादीनि मंगलमध्यानि मंगलान्तानिच प्रथन्ते शास्त्राणि नो इतराणि' ज्यांचा आरंभ मध्य आणि शेवट मांगल्यमय असतो तींच शास्त्रें सफळ होतात, इतर होत नाहींत, असें काव्यप्रकाशकारांनी सांगून ठेवलें आहे. परमेश्वर व त्याचें नांव ही मंगल आहे. भगवन्नाम 'मंगलांचें तें मंगल' आहे असें सर्व साधुसंतांनी वर्णन केलें आहे. त्यानुसार आज हजारों वर्षें भारतात 'ॐ स्वस्ति,' हरिः ॐ,' 'श्रीगणेशाय नमः,' इत्यादि शब्दांनी कोणत्याही शुभकार्याचा आरंभ करण्याचा प्रघात आहे. तो इतका रुळला की कार्याला आरंभ करणें अशा अर्थी 'श्रीगणेशा करणें' असा वाक्प्रचारच रूढ झाला. मंडाले येथून परत आल्यावर लों. टिळकांनी केसरींत पहिला अग्रलेख लिहिला त्याचें शीर्षक 'पुनश्च हरिः ॐ' असें होतें. गाजलेल्या त्या शीर्षकाचा 'आतां पुन्हां स्वातंत्र्यसंपादनाच्या प्रयत्नांची नव्यानें सुरुवात,' असाच अर्थ होता. आजही आरंभिलेल्या कार्यांत यश मिळावें या इच्छेनें आपल्या इष्ट देवतेचें पूजन, निदान स्मरण तरी करण्याची पद्धति सर्रास दृष्टीस पडते.

ही कार्यारंभीं देवतेचें स्मरण-वंदन-नमन करण्याची पद्धति अत्यंत अर्थपूर्ण आहे. नमस्कारांत नम्रता अपेक्षित आहे. समष्टिरूप परमेश्वरापुढें नम्र होण्यांत मी ही त्या समष्टीचाच एक घटक आहें याची जाणीव त्या नमस्कारांतून—नम्रतेतून व्यक्त होत असते. देवाला नमस्कार करतांना देव मोठा आहे, मीं लहान आहें. मला देवामुळेंच अस्तित्व आहे, मीं देवाचाच आहें अशी भावना असते, निदान असली पाहिजे. सर्वशक्तिमान परमेश्वर सर्व चराचर विश्वाच्या रूपानें साकार झाला आहे. त्या समष्टिरूपी अनंत विश्वापुढें कोणतीही एक व्यक्ति अगदीं नगण्य आहे. ती जर निसर्गाशीं, समष्टीशी, समाजाशीं समरस झाली नाहीं तर सुखासमाधानानें जगणें तिला अशक्य होईल.

व्यक्तीला सुख हवें असेल तर नियतीशी निसर्गाशीं समरस होणें आवश्यक आहे. ती समरसता परस्परांच्या अनुकूलतेनेंच प्राप्त होत असते आणि ही अनुकूलता नम्रतेनेंच लाभत असते. हें लक्षांत घेऊनच प्राचीन ऋषिमहर्षींनीं नम्रतेचें प्रतिक असलेल्या परमेश्वराला केलेल्या नमस्कारानें कार्याला आरंभ करावा असा आचार रूढ केला, त्याला अनुसरून 'केशवाय नमः' इत्यादि चौवीस नांवें उच्चारून आपले सर्व धार्मिक संस्कार केले जातात. तीं आज हजारों वर्षें आचारांत असलेलीं विष्णूचीं म्हणून प्रसिद्ध असलेलीं केशव माधव वगैरे नांवेंच कां निवडलीं ? तीं चौवीसच कां निवडलीं ? त्यांचा कोणता अर्थ अभिप्रेत आहे ? या विषयींची माहिती अत्यंत उद्बोधक आहे.

श्रीविष्णु, गणेश, ललिता, देवी यांचीं 'सहस्रनामें' प्रसिद्ध आहेत. शिवसहस्रनाम तितकें प्रसिद्ध नाहीं, परंतु 'रुद्र' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या वैदिक स्तोत्रांत जीं रुद्राचीं नांवें आहेत तीं सहज सहस्र असतील. वस्तुतः विश्वांतील प्रत्येक वस्तु परमेश्वर आहे. या भारतीय तत्वज्ञानाप्रमाणें जगांत जेवढ्या म्हणून वस्तु आहेत त्यांचीं नांवें ही परमेश्वराचींच नांवें आहेत. त्या दृष्टीनें परमेश्वराच्या नावांचें गणन करायला संख्याच अपुरी पडेल. गणकयंत्र सुद्धां असमर्थ ठरेल. अशा तऱ्हेनें 'अनन्त नामा' असलेल्या श्रीविष्णूचीं कोशकारांनीं

'विष्णुः नारायणः कृष्णः वैकुण्ठः
विष्टरश्रवाः ।
दामोदरः हृषीकेशः केशवः
माधवः स्वभूः ॥
दैत्यारिः पुण्डरीकाक्षः गोविन्दः
गरुडध्वजः ।
पीतांबरः अच्युतः शार्ङ्गी
विष्वक्सेनः जनार्दनः ॥
उपेन्द्रः इन्द्रावरजः चक्रपाणिः
चतुर्भुजः ।
पद्मनाभः मधुरिपुः वासुदेवः
त्रिविक्रमः ॥
देवकीनन्दनः शौरिः श्रीपतिः
पुरुषोत्तमः ।
वनमाली बलिध्वंसी कंसारातिः
अधोक्षजः ॥
विश्वंभरः कैटभजित् विधुः
श्रीवत्सलांछनः ॥
अमरकोश १/१

अशीं २९ नांवें दिलीं आहेत. तेव्हां या विष्णुसहस्रनाम पाठान्तरांत असूनही कोशांत केवळ २९ नांवांचाच संग्रह केला याचा, कोशकाळीं तींच आणि तेवढींच नांवें जनमानसांत रुळलेलीं होतीं असा अर्थ होतो. कोशांत २९ तर धार्मिकसंस्कारांत केशवापासून श्रीकृष्णापर्यंत २४ नांवेंच आहेत. त्यांत कोशांत नसलेलीं संकर्षण, अनिरुद्ध, प्रद्युम्न व नारसिंह अशी चार नांवें आहेत. त्यांत मुद्दां गंमत अशी की संकर्षण, अनिरुद्ध आणि प्रद्युम्न ही तीन क्रमशः बलराम, उषापति म्हणजे बाणासुराच्या उषा नांवाच्या मुलीचा पति, आणि कामदेव यांचीं नांवें म्हणून दिलीं आहेत. (अनिरुद्ध हा कृष्णाचा मुलगा व बाणासुराचा जावई) कोशांत विष्णूच्या नामावळींत नसलेलें नारसिंह (नरसिंह किंवा नृसिंह) हें एक नांव धार्मिक पाठांतील नामावळींत आहे. तसेंच कोशांत 'वामन' हें नांव नाहीं, पण वामनावताराशीं संबद्ध अशीं त्रिविक्रम आणि बलिध्वंसी अशी दोन नांवें आहेत, तर केशवादि चोवीस नांवांत वामन आणि त्रिविक्रम अशीं दोन नांवें आहेत. तें कांहीही असो हीं नांवें विष्णूचीं आहेत हें सर्वमान्य आहे. इतर इंद्र, वरुण, रुद्र इत्यादि देवता व त्यांचीं नांवें वेदकाळापासून प्रसिद्ध असतां विष्णूच्याच नांवांची निवड कां केली असावी याचा विचार नंतर करूं, हजारो नांवांपैकीं चोवीस नांवांचीच निवड कां केली असावी याचा विचार प्रथम करूंया.

'नामरूपात्मकं जगत्', नांव आणि रूप या मुळें जगाचें अस्तित्व जाणवतें, दृग्गोचर होतें. अमूर्त साकार होतें तेव्हांच तें दिसतें व दिसल्यानंतर त्याला नांव दिलें जातें, त्यामुळें त्याला 'वैशिष्ट्यपूर्ण' व्यक्तित्व लाभतें, व नंतर त्याला व्यवहार्यता–सुलभतेनें जाणण्याची –व्यवहारांत उपयोग होण्याची योग्यता प्राप्त होते. निर्गुण निराकार अव्यक्त परब्रह्म सगुण विश्वाच्या रूपानें साकार झालें. मग त्या विश्वांतील अनंत वस्तूंतील चेतन, बलशाली, उदात्त व्यक्ती त्या परब्रह्माचें प्रतिक मानल्या जाऊं लागल्या. त्यांना ईश्वर मानलें जाऊं लागलें.

'यद्यद् विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवागच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥
भ. गी.

विश्वांतील तेजस्वी उदात्त व उदात्त व्यक्तीचे ठिकाणी भगवन्ताच्या तेजाचा अधिक भाग

असतो या जाणिवेंतूनच 'अवतार' कल्पना रूढ झाली. अवतार 'जगतःस्थितिकारणम्' विश्वाच्या स्थैर्यार्थ असतात, त्यामुळें जगाच्या स्थितीचें कारण मानल्या गेलेल्या 'विष्णु' या देवतेशींच प्रायः सर्व अवतारांचा या नाहीं त्या रूपानें संबंध आलेला आहे.

प्राणिमात्राला आपली स्थिति-सुस्थिति असावी असें वाटत असतें. ती सुस्थिति जेव्हां आपल्या प्रयत्नांनीं साध्य होत नसते, तेव्हां बाह्य शक्तीचें, आपल्यापेक्षां मोठ्या शक्तीचें सहकार्य मिळविणें क्रमप्राप्तच असतें. आणि तें शक्तिकेंद्र अलौकिक असावें लागतें, कारण लौकिक शक्तिकेंद्र आत्मकेंद्रित, संकुचित दृष्टिकोनाचें व मर्यादित असतें. म्हणून स्थितीकरतां, स्थैर्याकरतां, सुख व समृद्धीकरतां सर्वव्यापक बलशाली अलौकिक शक्तिकेंद्राकडे सहाय्याकरतां धाव घेणें अगदीं स्वाभाविक आहे. 'विष्णु' हें एक अलौकिक शक्तिकेंद्र आहे. 'वेवेष्टि इति विष्णुः' जो सर्व विश्वाला संपूर्णपणें व्यापून रहातो तो विष्णु असा अर्थ आहे. असें सर्वव्यापी अर्थातच सर्वसमर्थ शक्तिशाली व्यक्तिमत्त्व, चतुर्भुज शंखचक्रगदापद्मधारी शक्तियुक्ति बललावण्य संपन्न मानवीरूपानें साकार झालें, आणि श्रीविष्णूची चतुर्भुज मूर्ति सर्वत्र प्रतिष्ठित झाली.

हा देव 'चतुर्णां पुरुषार्थानां दाता' आहे म्हणून चतुर्भुज आहे. असें एका कवीनें केलेलें वर्णन अर्थपूर्ण आहे. मनुष्यमात्राच्या सर्व आशा आकांक्षा धर्म अर्थ काम आणि मोक्ष यांत समावलेल्या आहेत. त्या पूर्ण करणाऱ्या भगवान् विष्णूचें नामस्मरण करून कार्याला आरंभ करण्याची प्रथा त्यामुळें रूढ झाली

आतां विष्णूच्या अनंत नांवातील केशवादि चोवीस नांवेंच कां रूढ करण्यांत आलीं याचा मागोवा घेणें आवश्यक आहे. 'निर्णयसिंधु' या प्राचीन धर्मशास्त्राच्या मान्यवर ग्रंथांत 'बोपदेव' नांवाच्या फार प्राचीन धर्मशास्त्रकाराचा चोवीस नांवाविषयींचा एक श्लोक उद्धृत केला आहे तो असा–

'केविगोवादापुहृपेप्रजाच्युकृममात्रिना ।
वाऽधोनृहसानिश्रीपाद
शाच्चगेविगपेचपे ॥

यांतील के वि इत्यादि अक्षरें केशव विष्णु इत्यादि २४ नांवांचीं आद्याक्षरें आहेत. श, च, ग, प हीं शंख चक्र गदा व पद्म या चार आयुधनामांचीं आद्याक्षरें आहेत. चार हात आणि चार आयुधें. शंख चक्र गदा पद्म अशा क्रमानें उजव्याबाजूच्या खालच्या हातापासून प्रदक्षिणा क्रमानें डाव्या बाजूच्या खालच्या हातापर्यंत तीं चार आयुधें असलेली मूर्ति सर्वप्रथम साकार झाली, व तिचें 'केशव' असें नामाभिधान करण्यांत आलें.

हा आयुधांचा क्रम बदलला, तर चार हात आणि चार आयुधें यांच्या ४×३×२×१ गणिताप्रमाणें २४ प्रकारच्या मूर्ति होतात. वर उल्लेखिलेल्या श्लोकानुसार त्या २४ मूर्तींचीं विश्वव्यापक चतुर्भुज विष्णूच्या प्रतीकांचीं केशवादि २४ नांवें रूढ झालीं आहेत. त्या श्लोकानुसार शंखचक्रादि आयुधांची स्थिति प्रत्येक मूर्तींत पुढीलप्रमाणें राहील—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) केशव– | शंख | चक्र | गदा | पद्म |
| २) नारायण– | प. | ग. | च. | शं. |
| ३) माधव– | च. | शं. | प. | ग. |
| ४) गोविंद– | ग. | प. | शं. | च. |
| ५) विष्णु– | प. | शं. | च. | ग. |
| ६) मधुसूदन– | शं. | प. | ग. | च. |
| ७) त्रिविक्रम– | ग. | च. | शं. | प. |
| ८) वामन– | शं. | च. | प. | ग. |
| ९) श्रीधर– | च. | ग. | शं. | प. |

१०) हृषीकेश– च. प. शं. ग.
११) पद्मनाभ– प. च. ग. शं.
१२) दामोदर– शं. ग. च. प.
१३) संकर्षण– शं. प. च. ग.
१४) वासुदेव– च. ग. प. शं
१५) प्रद्युम्न– शं. ग. प. च.
१६) अनिरुद्ध– ग. शं. प. च.
१७) पुरुषोत्तम– प. शं. ग. च.
१८) अधोक्षज– ग. शं. च. प.
१९) नारसिंह– प. ग. शं. च.
२०) अच्युत– प. च. शं. ग.
२१) जनार्दन– च. शं. ग. प.
२२) उपेन्द्र– ग. च. प. शं.
२३) हरि– च. प. ग. शं.
२४) श्रीकृष्ण– ग. प. च. शं.

हा आपला नित्य परिचित क्रम आहे. परंतु मूळ श्लोकांत के, वि, गो, वा, दा, पु. ह, उपेन्द्र, प्र, ज, अ, कृ, म, ना, त्रि. ना. का., अधोक्षज, नृसिंह, ह, संकर्षण, अनिरुद्ध, श्रीधर, पद्मनाभ, असा क्रम आहे. एका श्लोकांत सर्व नामांचा समावेश व आयुधस्थितीचा समावेश करण्याचे दृष्टीनें हा क्रम स्वीकारला असावा हें स्पष्ट आहे. 'शाचगे विगपेचपे' या एका चरणांत आयुधांची २४ प्रकारें रचना कशी होते हें सांगितलें आहे. 'अल्पाक्षरम् असंदिग्धम्' या सूत्राच्या लक्षणाचें दर्शन या श्लोकांत घडतें. कवीची ही रचना उत्कृष्ट कौशल्याचा नमुना आहे.

वरील सर्व नांवें संस्कृत आहे. संस्कृत भाषेंतील सर्व शब्द धातु+प्रत्यय असे निर्माण केलेले आहेत. 'सर्वं धातुजमाह शकटस्य स्तोकः' प्रसिद्ध वैय्याकरण शाकटायन याचे मतें सर्व शब्द धातूपासून निर्माण झाले आहेत. त्या दृष्टीनें धातु व प्रत्यय यांचा विचार करून केशवादि चावीस नामांचे कोशकारांनीं दिलेले अर्थ पुढीलप्रमाणें आहेत.

(१) केशव—क व ईश म्हणजे पुत्र आणि पौत्र यांनीं युक्त असलेला (पुत्रपौत्र देणारा).

(२) नारायण—नार+अयन = नारायण. नार म्हणजे पाणी. अयन म्हणजे स्थान-निवासस्थान असलेला. विश्वाच्या उत्पत्तीचें जल हें आद्य कारण (अद्‌भ्यः पृथ्वी) आहे. तेथें रहाणारा-असणारा, म्हणजेच विश्वाचें आदिकारण म्हणून नारायण.

(३) माधवः—मा + धव. मा – लक्ष्मी. धव–पति. पालन करणारा.

(४) गोविंदः—गो + विद. गो – गाय, पृथ्वी, स्वर्ग, वेद. गां अविन्दत इति गोविंदः। त्याला सागरानें कामधेनु दिली, इन्द्रानें स्वर्ग दिला, व त्यानें वराहरूपानें पृथ्वीचें उद्धरण व मत्स्यरूपानें वेदांचें उद्धरण केलें तो गोविन्द.

(५) विष्णुः—वेवेष्टि इति विष्णुः जो सर्व स्थिरचर विश्वाला व्यापून रहातो तो विष्णु.

(६) मधुसूदनः—मधुं सूदयति इति मधुसूदनः। मधुनांवाच्या राक्षसाला ठार मारणारा.

(७) त्रिविक्रमः—त्रि + विक्रमः त्रिषु-लोकेषु गुणेषु वा विक्रमः पदविन्यासः स्थितिर्वा यस्य. स्वर्ग, मृत्यु व पाताल या तीन भुवनांना किंवा सत्व, रज व तम या विश्वाच्या घटकभूत मुख्य तत्वांना व्यापून असणारा.

(८) वामनः—वामयति मदं इति वामनः मद–अहंकार टाकावयास लावतो तो वामन. (भौतिक वैभवांत मग्न झालेल्या 'बलि' राजाचा 'अहंकार' नष्ट केल्याची कथा प्रसिद्ध आहे.)

(९) श्रीधरः— श्रियं धारयति इति श्रीधरः। लक्ष्मी धारण करणारा.

(१०) हृषीकेशः — हृषीकाणां ईशः इंद्रियांचा स्वामी. इंद्रियांवर ताबा असलेला.

(११) पद्मनाभः — पद्म+नाभि. पद्मं नाभौ यस्य सः। ज्याच्या नाभिकमलांत कमळ आहे असा. (विष्णूच्या नाभींतून पद्म निर्माण झालें त्यांत ब्रह्मदेव आसनस्थ झाले व त्यांनी विश्वाच्या निर्मितीचें कार्य केलें हे सूचित करणारें चित्र प्रसिद्ध आहे. जल, कमल, व ब्रह्मदेव या तीन रूपकांनी विश्वाच्या निर्मितीचा क्रम सूचित केला आहे.)

(१२) दामोदरः — दाम+उदर. दाम उदरे यस्य सः दामोदरः। दाम-बंधन करण्याचें साधन–शक्ति. सर्व विश्वाला बंधनात ठेवण्याची शक्ति असलेला. (या संदर्भात यशोदेनें नटखट कृष्णाला दोरीनें बांधून ठेवल्याच्या कथेचा उल्लेख हा कवींच्या कल्पनेचा विलास आहे.)

(१३) संकर्षणः — सम्+कृष् — कर्षण. सम्यक् कृष्यते अनेन इति संकर्षणः सर्व विश्वाला आकर्षित करणारा. कृष् धातूचा 'शेती करणें' असाही अर्थ आहे. तदनुसार उत्तम शेती करणारा असाही अर्थ होतो.

(१४) वासुदेवः — वसुदेवस्य अपत्यं वासुदेवः वसुदेवाचा पुत्र.

'सर्वत्रासौ समस्तं च वसत्यत्र वै यतः।
ततोऽसौ वासुदेवेति विद्वद्भिः परिगीयते ॥
विष्णुपुराण.

हा सर्व ठिकाणी रहातो आणि सर्व विश्व याचे ठिकाणी रहातें म्हणून, विद्वान् याला वासुदेव म्हणतात.

(१५) प्रद्युम्नः—प्रकृष्टं द्युम्नं (तेज) यस्य सः। अत्यंत तेजस्वी.

(१६) अनिरुद्धः—अ निरुद्धः। अप्रतिगति असलेला.

(१७) पुरुषोत्तमः—सर्वश्रेष्ठ. 'चतुर्विंशातितत्त्वात्मा पंचविंशाख्यपुरुषः' उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः इत्यादि वचनांत वर्णन केलेला, पुरुष-परमात्म-म्हणजेच पुरुषोत्तम. मन बुद्धि यांच्याही पलीकडे असलेलं 'चैतन्यरूपतत्त्व'.

(१८) अधोक्षजः— अधः+अक्ष+ज. अधरकृतं अक्षजं-ज्ञानं येन सः अधोक्षजः। सामान्यांचें ज्ञान इंद्रियजन्य असतें. परमात्मा 'ज्ञानमय'च असतो. त्याला इंद्रियरूपी साधनांची आवश्यकताच नसते. ज्याच्यापुढें इंद्रियजज्ञान कमी प्रतीचें ठरतें असा ज्ञानमय परमेश्वर.

(१९) नारसिंहः— नृसिंहः, नरसिंहः किंवा नारसिंहः नृणां-नृषु, नराणां-नरेषु, नाराणां-नारेषु वा सिंहः (श्रेष्ठ)। नरश्रेष्ठः (ना च सिंहः च नृसिंहः. मनुष्य आणि सिंह यांचें संयुक्त रूप धारण केलेला असा नृसिंहावतारी विष्णु.)

२०) अच्युतः—नच्युतं-स्खलनं यस्य सः। आपल्या पदापासून कधींही च्युत न होणारा. स्थिर.

(२१) जनार्दनः — जन+अर्द् (अर्दना) जनान् अर्दयति नाशयति इति जनार्दनः। 'जन'चे सागरात रहाणारे 'राक्षस व जन्म' असे दोन अर्थ आहेत. सागरांतील दैत्यांचा नाश करणारा, जन्माचें अर्थात मरणाचेंही दुःख नष्ट करणारा.

(२२) उपेन्द्रः—इन्द्राचा धाकटा भाऊ.

(२३) हरिः—हरति इति हरिः सर्व दुःखें हरण करणारा.

(२४) श्रीकृष्णः—श्रियं कर्षयति इति श्रीकृष्णः। श्रीः शब्द श्रिया, धनधान्यादि संपत्ति आणि मांगल्यवाचक आहे. श्रिया, वैभव आणि मांगल्य देतो तो श्रीकृष्ण.

अशा रीतीनें चतुर्भुज भगवान श्रीविष्णूच्या चार आयुधांच्या हेरफेरानें होणाऱ्या २४ मूर्ति, त्यांची नांवें व त्यांचे अर्थ यांचें दिग्दर्शन केलें. ह्या चौवीस नामांच्या नित्य नैमित्तिक धर्माच्या आचरणांत प्राधान्यानें समावेश करण्यामागील दोन संकेतांचाही मागोवा घेणें उपयुक्त व उद्बोधक आहे.

विश्वात्मक परमेश्वराशीं एकरूप होणें हें भारतीय संस्कृतीचें-अंतिम साध्य आहे. तें सतत डोळ्यांसमोर रहावें या दृष्टीनें आपले आचार रूढ करण्यांत आहेत. पुरुष-सूक्त अथवा वेदांतील या विराट विश्वरूप पुरुषाचें तात्विक व कांहींसें गूढ तात्विक रूप वर्णन करणाऱ्या ऋचांचा समावेश पूजादिक आचारांत करण्यांत आला आहे तो वरील हेतूनेंच करण्यांत आला आहे. पूजेंतील स्नान विलेपन धूपदीपादि सोळा उपचार अर्पण करतांना वेदांतील वेगवेगळ्या सोळा ऋचा म्हणण्याचा प्रघात आहे. वस्तुतः त्या ऋचांचा अर्थ आणि तो तो उपचार यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. उदाहरणार्थ–'चंद्रमा मनसो जातः' ही ऋचा नैवेद्य अर्पण करण्याचे वेळी म्हटली जाते. वस्तुतः नैवेद्य आणि ती ऋचा यांचा कांहीं संबंध नाहीं. तरी ही विश्वाच्या निर्मितीतील कांहीं सूत्रें सांगणारी ती ऋचा नित्य स्मरणांत रहावी या हेतूनें नित्याच्या आचारांत समाविष्ट करण्यांत आली. अशा उद्देशानेंच चौवीस नांवें प्रत्येक संस्कारांत उच्चारण्याची प्रथा रूढ करण्यांत आली आहे. विश्वांतील मूलभूत चौवीस तत्त्वांची स्मृति कायम रहावी म्हणून नांवें २४ च घेतली असावी.

'कणाद' नांवाचा महर्षि हा पहिला भारतीय 'अणु' संशोधक. त्यानें संशोधन करून विश्वाची मूलभूत २४ तत्वें शोधून काढलीं तीं अशीं —
प्रकृति, महत्तत्व, अहंकार, आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी हीं पंचमहाभूतें. तन्मात्रा–शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध-शिवाय अहंकारापासूनच मन आणि दहा इंद्रियें निर्माण होतात. अशीं हीं एकूण पृथ्वीची मूलभूत २४ तत्वें. हीं 'जड' आहेत. यांच्या पलीकडे असलेला 'चैतन्यमय पुरुष' तो पंचविसावा.

त्याचप्रमाणें शास्त्रकारांनीं रूप, रस, गंध, स्पर्श संख्या, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, गुरुत्व, द्रवत्व, स्नेह, शब्द, बुद्धि, सुख, दुःख इच्छा, द्वेष, प्रयत्न, धर्म, अधर्म व संस्कार असे विश्वांतील मूलभूत २४ गुण सांगितले आहेत. पुरुषोत्तम जसा २४ तत्वांपेक्षां पर आहे तसाच तो वरील सर्वगुणातीत आहे असें सर्वत्र वर्णिलें आहे.

अशा ह्या मूलभूत जडतत्वांचें, गुणांचें व त्याही पलीकडल्या परतत्वाचें सतत स्मरण रहावें या विचारानें सर्वव्यापी विष्णूच्या नांवांनी आपले नित्य नैमित्तिक आचार पाळण्याची पद्धति रूढ झाली ती अर्थपूर्ण आहे.

संध्या असो किंवा शिवाची, गणपतीची या देवीची पूजा असो सर्वांची सुरुवात 'केशवाय नमः' या नामानेंच होते. 'सर्व विष्णुमयं जगत्' हें तत्व त्यांत समावलेलें आहे.

या नावांची शाब्दिक व्युत्पत्ति, कल्पना, भिन्न भिन्न असल्या तरी त्या लक्षांत न घेतां सर्व जड तत्वातीत, गुणातीत असें जें सच्चिदानंदमय परमात्मस्वरूप आहे त्याचींच ही चौवीस नांवें आहेत हें मनांत धरून त्यांचा उच्चार करावा. त्यानें मांगल्य प्राप्त होईल. "ॐ तथास्तु"

# प्रपंच आणि अश्वत्थ

प्राचीनतम भारतीय तत्त्वज्ञानाचें सारभूत संकलन म्हणजे श्रीमद्भगवद्गीता. तिच्या पंधराव्या अध्यायांत 'प्रपंचावर' अश्वत्थाचें (पिंपळाचें) अत्यंत अर्थपूर्ण आणि रमणीय रूपक केलें आहे :

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं
वेद स वेदवित् ॥ गीता १५/१

हा प्रपंच म्हणजे सारें विश्व अश्वत्थवृक्ष आहे. त्याचीं मुळें वर आहेत. शाखा (फांद्या) खालीं आहेत. ज्ञानाचा आगम असलेले वेद त्याचीं पानें आहेत. तो अव्यय अविनाशी आहे. ज्याला या प्रपंचरूपी अश्वत्थाचें ज्ञान होतें, आकलन होतें तोच खरा ज्ञानी होय.

यांतील अश्वत्थ शब्दाचा 'न श्वः तिष्ठति सः अश्वत्थः' म्हणजे जो उद्यां नसतो तो अश्वत्थ असा अर्थ आहे. 'क्षणे क्षणे यन्नवतामुपैति । तदेव रूपं रमणीयतायाः' क्षणाक्षणाला नाविन्य प्राप्त होणें हें रमणीयतेचें स्वरूप आहे असें महाकवींनीं वर्णन केलें आहे. विश्वांतील वस्तुमात्राचें स्वरूप ही तसेंच आहे. कणाकणानें आणि क्षणाक्षणानें वस्तुमात्राच्या स्वरूपांत बदल घडत असतो, नाविन्य प्राप्त होत असतें. या क्षणीं असणारें रूप- अवस्था पुढच्या क्षणीं नसते. हा बदल अत्यंत सूक्ष्म असल्यामुळें लगेच जाणवत नाहीं इतकेंच ! सतत परिवर्तनशीलता हेंच विश्वाचें स्वरूप आहे. ही परिवर्तनशीलता वृक्षाचे ठिकाणीं सर्वसामान्यांनाही आढळते. बीजांतून बाहेर आलेला अंकुर दिवसागणिक वाढत जाऊन वृक्षाच्या रूपांत परिणत झालेला दिसतो. तिळा एवढें वडाचें बीज, त्यांतून प्रचंड वृक्ष निर्माण होतो. हें दृश्य परिचयाचें असल्यामुळें, त्याच्या रूपकानें हें विशाल विश्व, अत्यंत सूक्ष्म पण विकसनशील बीजभूत परतत्त्वाचा विकास आहे. हें दाखविलें आहे. प्रपंचाच्या विकासाचें रहस्य चटकन समजण्याकरतां प्रपंचावर वृक्षाचें रूपक केलें आहे.

रूपक अलंकारांत 'वर्ण्य–उपमेय आणि अवर्ण्य–उपमान' यांचें ऐक्य वर्णन केलेलें असतें, परंतु तीं एकरूप नाहींत हें माहीत असूनही त्यांच्यांत म्हणजे उपमेय उपमानांत अत्यंत साम्य आहे हें सांगण्याकरतां रूपक अलंकार केला जातो. गीतेंतही त्याच दृष्टीनें प्रपंचावर वृक्षाचें रूपक केलें आहे. अश्वत्थाचें-वृक्षाचें वर्णन अभिप्रेत नसून प्रपंचाचेंच परिवर्तनशीलत्व, अस्थिरत्व हेंच सांगावयाचें आहे.

ज्ञानेश्वर महाराजांनीं याविषयीं सुंदर विवेचन केलें आहे :

तरी श्वा(श्वः) म्हणिजे उखा (उद्या) । तोंवरि एकसारिखा । नाहीं निर्वाहो यया रुखा । प्रपंचरूपा ॥ १११ ॥ जैसा न लोटतां क्षणु । मेघु होय नानावर्णु । कां विजु नसे संपुर्णु । निमेषभरी ॥ ११२ ॥ ना कांपतया पद्मदळा । वरीलिया जैसा नाहीं थळा । कां चित्त जैसें व्याकुळा । माणुसाचें ॥ ११३ ॥ तैसीचि ययाची स्थिति । नासत जाय क्षणाक्षणाप्रती । म्हणौनि ययातें म्हणती । अश्वत्थू हा ॥ ११४ ॥ आणि अश्वत्थु येणें नांवें । पिंपळू म्हणती स्वभावें । परि तो अभिप्राय नोहे । श्रीहरीचा ॥ ११५ ॥ वृक्ष आज आहे तसा उद्यां सकाळीं नसतो. प्रपंच ही तसाच आहे म्हणून त्याला वृक्ष-अश्वत्थवृक्ष म्हणतात. क्षणाक्षणाला मेघांचं रूप आणि आकार बदलतात. चमकून क्षणांत नष्ट होणारी वीज कधी संपूर्ण रूपांत पहाता येत नाहीं. क्षणभरसुद्धां ती स्थिर असत नाहीं, वायुलहरींनीं कंपित होणाऱ्या कमलदलांवर पडलेले जलबिंदु

क्षणभरही स्थिर रहात नाहींत, व व्याकुळ झालेल्या माणसाचें मन जसें निमिषभरसुद्धां स्थिर रहात नाहीं, तशी या विश्वाची स्थिति आहे. क्षणाक्षणाला त्याची पहिली अवस्था नष्ट होत असते, नवी नवी अवस्था प्राप्त होत असते, म्हणून त्याला अश्वत्थ म्हणतात. लौकिक व्यवहारांत अश्वत्थ म्हणजे पिंपळ (पिप्पल) असें म्हटलें जातें, परंतु गीतेंत अश्वत्थ म्हणजे प्रपंच-विश्व असा अर्थ श्रीकृष्णाला अभिप्रेत आहे. ज्ञा. अ. १५/१११-११५.

पिंपळाप्रमाणें इतर सर्व वृक्ष प्रतिक्षण परिवर्तनशील आहेत, परंतु त्यांच्यांत पिंपळ हा पवित्र वृक्ष मानला असल्यामुळें रूपकाकरतां त्याचें नांव निवडलें गेलें. कारण, जी वस्तु सर्वत्र प्रसिद्ध आहे, जिचे गुणधर्म व वैशिष्ट्य सर्वांना माहीत आहे, अशाच वस्तूचा 'उपमान' म्हणून उपयोग करावा, असा साहित्य शास्त्राचा दंडक आहे.

प्राचीनतम वेदवाङ्मयांतील पुढील ऋचेंत प्रपंचावर पिप्पलवृक्षाचें (अश्वत्थाचें) अर्थपूर्ण सुंदर रूपक केलें आहे—

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं
परिषस्वजाते।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्यनश्नन्नन्यो
अभिचाकशीति॥

या प्रपंचरूपी पिंपळावर परस्परांना सर्वथा अनुरूप असलेले गुणशाली दोन पक्षी परस्परांना अगदी बिलगून बसलेले आहेत. त्यांच्यापैकी एक जण पिंपळाचें मधुर फळ भक्षण करून आनंदात मग्न आहे. तर दुसरा तें फळ न खातां पूर्ण आनंदमय अवस्थेंत विराजमान बसलेला आहे. प्रकाशमान होत आहे.

या वेदमंत्रांतील सुपर्ण (उत्तम पंख असलेले) शब्दानें ध्वनित केलेले दोन पक्षी, म्हणजे जीव आणि शिव किंवा जीवात्मा आणि परमात्मा होत. त्यांपैकी एक जण म्हणजे जीवात्मा, प्रपंचरूपी पिंपळाचें सुखरूपी मधुर फळ भक्षण करीत आनंदांत असतो, तर दुसरा पक्षी म्हणजे परमात्मा, तें फळ न खातां आपल्या मूळच्या आनंदमय अवस्थेंत असतो. म्हणजेच या प्रपंचांतील सुखाचा वा दुःखाचाही परिणाम जीवात्म्यावर होत असतो, परमात्म्यावर होत नसतो. तो अगदी तटस्थ असतो. निर्लेप रहातो. ते दोघे जरी परस्परांना अगदी बिलगलेले असले तरीसुद्धां त्यांच्यांतला एक म्हणजे जीवात्माच सुखी वा दुःखी होतो, तर दुसरा म्हणजे परमात्मा, पूर्णतया सुखदुःखातीत असतो. आनंदमय असतो.

या वेदमंत्रांत अश्वत्थ, पिप्पल, दोन पक्षी व पिंपळाचें फळ खाणें या रूपकांच्या रूपानें, प्रपंच व त्यांतील सजीव प्राणिमात्र, आणि त्यांच्या जीवात्म्याचा परमात्म्याशीं संबंध आणि प्राणिमात्रांना होणारी सुखाची वा दुःखाची प्राप्ति, या विषयीचें मौलिक दर्शन घडविलें आहे.

समष्टिरूप प्रपंच-दृश्यमान सर्वचराचरविश्व हा अश्वत्थवृक्ष आहे. आणि व्यक्ति हे त्याचे पल्लव आहेत. पानें आहेत. व्यक्ति आणि समष्टि म्हणजे प्रपंच. यांचा संबंध कसा असावा, कसा असला पाहिजे, तो संबंध कसा सुखदायी होऊं शकतो हें त्या अश्वत्थाच्या रूपकानें सूचित केलें आहे.

अश्वत्थ म्हणजे पिंपळ. हा वृक्ष इतर वृक्षांपेक्षां वैशिष्ट्यपूर्ण आहे. परंपरागत संस्कारांमुळें त्याच्या विषयीं जनमानसांत वसत असलेल्या पावित्र्याची भावना दूर ठेविली तरी त्याच्या पानांचा आकार आणि त्या

पानांची मंदशा वायुलहरींनीं होणारी हालचाल व खळखळ असा आवाज मनाला सुखवीत असतो. स्वच्छंदपणाचें त्या पानांचें नयनरम्य हेलकावे, स्पंदनें पाहिली म्हणजे सुखदुःखांनीं हेलकावणाऱ्या मानवी मनाची आठवण येते.

वसंताच्या आगमनाची चाहूल आली म्हणजे एकीकडे जीर्ण पानें गळून पडत असतात तर दुसरीकडे मृदुमुलायम कोवळीं कोवळीं इवलालीं लालसर पानें निर्माण होत असतात. वृक्ष स्थितप्रज्ञासारखा स्थिर असतो, जीर्ण पानांची अखेरची हालचाल सुरू असते, तर नव्यानें उगवणाऱ्या नाजुक पर्णांची जीवनाच्या आरंभाची गोड हालचाल सुरू असते. पानगळीनें पर्णहीन झालेली एक फांदी मनाला खिन्न करते तर नवजीवनाचा संदेश देणाऱ्या पालवीनं बहरलेली दुसरी फांदी नयनांना सुखवीत असते, मनाला आनंदविभोर करीत असते.

प्रपंचांतही असेंच घडत असतें नाहीं का ?

पिंपळाचीं पानेंच स्वच्छंद स्पंदन—नर्तन कां करूं शकतात ? इतर वृक्षांचीं पानें तसें कां करूं शकत नाहीत ? याचें कारण स्पष्ट आहे. आधारभूत वृक्षाच्या फांदीला जोडणारें देठ लांब असणें हें पिंपळपानाचें वैशिष्ट्य आहे. इतर वृक्षांचीं पानें आखुड देठामुळें फांद्यांना चिकटलेलीं असतात, त्यामुळें त्यांची हालचाल स्वतंत्र नसते.

प्रपंच-समाज-संसार हा सतत परिवर्तनशील म्हणूनच शाश्वत असा अश्वत्थवृक्ष आहे. प्राणिमात्र त्याचीं चळव पानें आहेत. आपलें कुटुंब त्या विशाल विश्वाची अश्वत्थाची एक लहानशी शाखा आहे. कुटुंबांतील विविध नात्यांची अनेक माणसें हीं पानें आहेत. कुटुंबाचे घटक आणि कुटुंबप्रमुखाचे संबंध पिंपळ आणि पिंपळपान यांच्या सारखे असावेत.

व्यक्ति कुटुंबाशीं-समाजाशीं संबद्ध असणारच. असलीच पाहिजे. पण त्या संबद्धतेचें कारणीभूत बंधन पिंपळपानाच्या देठाप्रमाणें असलें पाहिजे. व्यक्तित्वाच्या अनुभूतीला, विकासाला वाव देणारें असलें पाहिजे.

प्रपंचावरचें हें पिंपळाचें रूपक हृद्य आणि अर्थपूर्ण आहे. पिंपळपानांचें तें स्वच्छन्द मनोहारी नर्तन तासन्तास पहात असतांना जाणवतें कीं व्यक्तिमात्राला समाजाचें-कुटुंबाचें बंधन आवश्यकच आहे पण तें नैसर्गिक आणि विकासोन्मुख असावें. असें असेल तरच व्यक्ति आणि समाज सुखी राहील. विकसित होईल.

## नमस्कार

आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्व देवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥

या सुप्रसिद्ध सुभाषितांत, आकाशांतून भूपृष्ठावर कोठेंही पडलेलें पाणी शेवटीं समुद्रांत जातें, त्याप्रमाणें कोणत्याही देवतेला उद्देशून केलेला नमस्कार केशवालाच पोंचतो, असें वर्णन केलें आहे.

वरील सुभाषितांत दिलेला सागराचा दृष्टान्त समर्पक आणि मार्मिक आहे. समुद्र, सागर, अब्धि, जलधि इत्यादि अनेक नावें असलीं तरी सागर ही वस्तु एकच आहे. त्या प्रमाणें केशव, शिव, शक्ति, गणपति इत्यादि अनेक

नांवें असली तरी परमात्मतत्व एकच आहे. कोणालाही नमस्कार करा तो विश्वात्मक परमात्म्यालाच पोंचतो.

देव जसे अनेक तसेच नमस्काराचे प्रकार पण अनेक नमस्कार, साष्टांग नमस्कार (दंडवत), रामराम, जोहार, पालागन (चरणस्पर्श किंवा चरणीं माथा) सलाम, सॅल्युट, हस्तांदोलन-हातांचें, कपाळाचें, कपोलांचें किंवा केशकलापाचें चुंबन इत्यादि अनेक प्रकार रूढ आहेत. त्यांत क्रियांची भिन्नता असली तरी, त्यांचें दुसऱ्याबद्दल आदर, कृतज्ञता, प्रेम, आत्मीयता व्यक्त करणें हें उद्दिष्ट एकच आहे.

वरील प्रकारांपैकी 'पालागन' पर्यंतचे प्रकार अगदीं भारतीय आहेत. सलाम व सॅल्यूट हे भारतीयांत रूढ असले तरी ते परकीय आहेत. सलाम मुस्लीम तर सॅल्यूट युरोपियन संस्कृतीचा वारसा आहे. पाश्चात्त्यांच्या सैनिकी वातावरणांतून तो आपल्याकडे आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारखी विशुद्ध भारतीय संघटना 'ध्वजप्रणाम' म्हणून लष्करी शिस्तीचा 'सॅल्यूटच' करीत असते. (सैनिकांचा उजवा हात कपाळाजवळ असतो. स्वयंसेवकांचा छातीशीं असतो इतकाच फरक)

प्रारंभीं दिलेले नमस्कार आणि साष्टांग नमस्कार अगदीं फार प्राचीन कालापासून रूढ आहेत. नमस्कार हा ज्या कृतज्ञतेचा आविष्कार आहे, ती पशुपक्ष्यांमध्यें वृक्षवल्लरींमध्यें मुद्दां असते. ती कृतज्ञता अभिव्यक्त करण्याचें सुलभ साधन म्हणजे नमस्कार. नमस्कारांत नम्रता अभिप्रेत आहे. ती शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक असावी लागते. बुद्धीचें केंद्रस्थान मस्तकांत आहे. म्हणून मस्तक नमवून हात जोडणें म्हणजे नमस्कार. ज्या अलौकिक शक्तीनें—परमात्म्यानें आपणाला निर्माण केलें, हें सर्व विश्व निर्माण केलें त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरतां नतमस्तक होऊन नमस्कार करण्याची सुरवात झाली. नंतर आपल्याला जन्म देणाऱ्या मातापित्यांना, ज्ञान देणाऱ्या गुरूला, जीवनांत सहाय्यभूत होणाऱ्या व्यक्तींना, इतकेंच नव्हे सहाय्यभूत होणाऱ्या पशुपक्ष्यांना, वृक्षवल्लरींना आणि अचेतन मानल्या जाणाऱ्या नदी, डोंगर, पर्वत इत्यादिकांना मुद्दां त्या परमेश्वराचे अंश म्हणून नमस्कार करण्याची पद्धति रूढ झाली. परस्परांनीं परस्परांना देव मानून नमस्कार करणें, रामराम करणें सुरू झालें. पुढें पुढें देव, कृतज्ञताभिव्यक्ति वगैरे मूलभूत भावना नष्ट होऊन केवळ शिष्टाचार म्हणून मस्तक नम्र न करतां केवळ हात जोडण्याची किंवा हातांतल्या वस्तुसह हात उंचावण्याची-वर करण्याची पद्धति सुरू झाली.

मुळांत कृतज्ञता, आनंद व्यक्त करण्याच्या उदात्त भावनेनें सहजतेनें घडणारा—केला जाणारा नमस्कार पुढें देवाजवळ किंवा अन्य श्रेष्ठ संपन्न व्यक्तीजवळून कांहीतरी मिळविण्याच्या दृष्टीनें केला जाऊं लागला. (त्यामुळेंच त्याला व्यवहारांत लाचारीचें प्रतिक मानलें जाऊं लागलें असावें) आपल्याला इष्ट असलेली वस्तु मिळविण्याचें साधन या भावनेंतून 'दुर्जनं प्रथमं वन्दे' ही कल्पना रूढ झाली. दुर्जनानें आपणाला त्रास देऊं नये म्हणून सर्व प्रथम त्याला वंदन करावें, नमस्कार करावा असें सुभाषितकारही सांगूं लागले.

वस्तुतः हें विडंबन आहे. चांगल्या गोष्टींचें-गुणांचें, आचारांचें विडंबन पूर्वापार होत आलें आहे. तें करण्यांत मोठमोठे लोक आपल्या बुद्धीची आणि प्रतिभेची कृतार्थता

मानीत असतात. जगांत अशी एकही चांगली व्यक्ति वा वस्तु नसेल जिचें कोणी विडंबन केलें नाहीं. त्याबरोबर हेंही तितकेंच खरें आहे कीं विडंबनामुळें चांगल्याचा चांगलेपणा नष्ट झालेला नाहीं. होणार ही नाहीं.

नमस्कारांबाबतही तसेंच आहे. देव न मानण्याचा भाव आणणारे साहित्यिक नाटक कथा कादंबऱ्यांतून 'साष्टांग' नमस्काराचें विडंबन करतात पण त्यांच्या दृष्टीनें जेथें 'दिव्यत्व' आढळतें तेथें दंडवत घालतात. एका प्रसिद्ध लघुकथाकारानें 'मीं नमस्काराच्या विरुद्ध होतों, पण कन्याकुमारीचा तो प्रशस्त, प्रसन्न सागर किनारा आणि तें भव्य दिव्य नैसर्गिक वातावरण पाहिलें आणि त्या अलौकिक विराट् रूपाला साष्टांग नमस्कार घालावा असें मला वाटलें, आणि माझी प्रतिमा जपण्याकरतां जनसंमर्दापासून दूर जाऊन अगदी साष्टांग नमस्कार घातला' असें लिहिलें आहे.

असा हा नमस्कार भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य आहे. हस्तांदोलन इत्यादि प्रकारांपेक्षां आरोग्याच्या दृष्टीनें तो सर्वश्रेष्ठ आहे. साष्टांग नमस्काराची महती सर्वविदित आहे. साधा हात जोडून करावयाच्या नमस्कारांतही शारीरिक आणि मानसिक आरोग्याचें मर्म साठविलेलें आहे. जुलै १९८६ च्या सद्धर्माच्या अंकांत 'मुद्रांचें' विवेचन करतांनां आपल्या मनगटापासून पुढील हातांत ज्ञान व मज्जातंतूंची एकूण २९ केंद्रें आहेत. त्यांच्यावर दाब दिला असतां शारीरिक व मानसिक आरोग्य प्राप्त होतें असें लिहिलें आहे. अलीकडील 'ॲक्यूप्रेशर' ही विज्ञानावर आधारलेली उपचार पद्धती त्याच तत्वावर आधारलेली आहे. हें दर्शवून हातांतील सर्व केंद्रांवर दाब देण्याच्या दृष्टीनें सुलभ अशा शंखमुद्रेची माहिती दिली आहे. त्या शंखमुद्रेपेक्षां दोन्ही हात नीट जोडून नमस्कार करणें अगदीं सहज आणि सुलभ आहे. नमस्कारानें सुद्धां हातांतील सर्व महत्वाच्या केंद्रांवर दाब पडतो आणि अनायासें 'ॲक्यूप्रेशरची' क्रिया घडते. मात्र हातांचा परस्परांवर दाब पडला पाहिजे या जाणिवेनें हात जोडले पाहिजेत. कसे तरी जोडून किंवा दोन हातांमध्यें पोकळी ठेवून काम भागणार नाहीं. इच्छित साध्य होणार नाहीं. म्हणून नमस्कार करावा आणि तो नीट जाणीवपूर्वक करावा. त्यामुळें कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या आपणाला आणि ज्याच्या विषयीं कृतज्ञता व्यक्त करतो त्यालाही अपूर्व आनंद लाभत असतो.

म्हणूनच असा हा नमस्कार प्राचीन विचारवंतांनीं आपल्या आचारांत रूढ केलेला आहे. कोणत्याही देवतेला उद्देशून तो करा, तो त्या एकमेवाद्वितीय अशा परमात्म्यालाच पोचेल, या अर्थाच्या पूर्वी दिलेल्या सुभाषिताच्या चालीवर आजच्या भाषेंत 'सर्व रोगनमस्कारः आरोग्यं प्रति गच्छति' असें म्हणतां येईल. देव नको, देवत्व नको, पण निरामयत्व तरी हवें ना ! मग जो कोणता शारीरिक वा मानसिक आमय (रोग) असेल त्या दुर्जनाला नमस्कार करा. कोणालाही उद्देशून नमस्कार करा तुम्हांला आरोग्य प्राप्त होईल.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
ह. ज. दामले, संपादक 'सद्धर्म'
२२४, वि. प. रोड, मुंबई ४००००४

# अमृतकण कोवळे

आन्तरराष्ट्रीय ख्यातीचे तत्त्वचिंतक आणि याज्ञवल्क्य, शंकराचार्य, ज्ञानेश्वर इत्यादिकांचा वैचारिक वारसा समर्थपणें सांभाळणारे श्रीमान् पांडुरंग शास्त्री आठवले यांची प्रवचनें ज्ञानाचा, बोधाचा 'सुकाळु' असतो, हें सर्वश्रुत आहे. सर्वानुभूत आहे. त्यांच्या प्रवचना इतकाच, किंबहुना कांकणभर सरस असा विलक्षण आनंद त्यांच्याशी मोकळे-पणानें बोलतांना लाभत असतो. प्रवचनांत विषयाचा बांधिलपणा असतो, स्थान व प्रसंग यांच्या मर्यादा पडत असतात. साहित्यिक भाषेत बोलायचें म्हणजे प्रवचनें निबंधा-सारखीं असतात तर, खाजगी बैठकींत किंवा फिरायला गेलें असतां मुक्तपणें बोलणें लघु-निबंधासारखें असतें.

भगवान् योगेश्वराच्या भक्तीचें वास्तवरूप जीवनांत कृतिभक्तीच्या द्वारा व्यक्तीचे ठिकाणीं अभिव्यक्त करण्याच्या कार्यात सतत मग्न असलेल्या दादांना (शास्त्रीजींना) मोकळा वेळ असणें व त्याचा लाभ आमच्या सार-ख्यांना मिळणें हा कपिलाषष्ठीचा योग असतो. भाग्यानें वर्षातून एकदोन वेळां त्यांच्याबरोबर फिरायला जाण्याचा योग येतो.

मरीन ड्राइव्हवर सकाळीं त्यांच्याबरोबर फिरतांना त्यांच्या तोंडून सहजपणें बाहेर पडणारे मौल्यवान व मौलिक विचार ऐकतांना ज्ञानेश्वरांच्या 'अमृतकण कोवळे' या उपमेचें स्मरण होतें.

चंद्राचे अमृतमय किरण भूतलावर पसर-तात तशा सहजतेनें त्यांचे विचार प्रकट होत असतात. एके दिवशीं सकाळीं फिरत असता जवळून कांहीं श्रावक श्राविका (जैन साधु साध्वी) लगबगीनें आपल्या प्रार्थनामंदिराकडे जात होत्या. ते पाहून स्वाभाविकपणें निर-निराळ्या धर्मपंथांच्या आचारांविषयी बोलणें सुरू झालें. तेव्हां शास्त्रीजी म्हणाले-एकदोन महिन्यांपूर्वी फिरायला आलों असतां असाच एक श्रावक संघ एका बाजूनें जात असतां समोरून मुंबईतील एक शिक्षणशास्त्रज्ञ आणि परखड विचारवंत म्हणून प्रसिद्ध असलेले गृहस्थ येत होते. सतत सिगरेट ओढणारे ते आपल्याच तंद्रीत असल्यामुळें अगदीं जवळ येईपर्यंत माझ्याकडे त्यांचें लक्ष गेलें नव्हतें. पण लक्षांत येतांच तोंडांतली सिगरेट चटकन टाकून नमस्कार करीत म्हणाले—आज फार दिवसांनीं भेट झाली. आनंद झाला. चला आज तुमच्या बरोबर फिरूंया, असें म्हणून माझ्याबरोबर चालूं लागले. बोलणें सुरू झालें. इतक्यांत समोरून आणखी कांहीं श्रमण आले, त्यांच्याकडे पहात ते म्हणाले, 'शास्त्रीजी, या लोकांचा हा आचार मला बिल्कूल पसंत नाहीं.' हा त्यांचा ढगळ मळकट पोशाख, सकाळींच प्रार्थना मंदिरांत जाणें, हें सारें कालविसंगत आहे. प्रार्थना मंदिरांत जाऊन त्यांना काय मिळतें कोण जाणे. मी हें कधींही करणार नाहीं. तुम्हांला काय वाटतें?'

प्रश्न ऐकून क्षणभर स्तब्ध रहालों आणि म्हणालों-प्राध्यापकसाहेब, तुम्ही सतत ही सिगरेट कां ओढीत असतां? सिगरेट ओढणें आरोग्याला अपायकारक, हृदयविकार उत्पन्न करणारी आहे असें माहीत असूनही तुमच्या-सारखा विज्ञाननिष्ठ विचारवंत सिगरेट कां ओढतो ?

सिगरेट अपायकारक असेल, पण ही ओढल्यामुळें माझे मज्जातंतू उत्तेजित होतात. ज्ञानतंतू जोमानें कार्यप्रवण होतात. मन केंद्रित होतें. मी शांतपणें विचार करूं

शकतों म्हणून मीं सिगरेट ओढतों असें प्राध्यापकांनी निर्धारात्मक उत्तर दिल्यावर मीं म्हणालों, 'महाशय, ज्ञानतंतु प्रोत्साहित करणारें, मन केंद्रित करणारें जगांत सिगरेट हेंच एकमेव साधन आहे का?'

सकाळीं शुचिर्भूतपणें प्रार्थना मंदिरांत जाऊन मूर्तीपुढें निर्विकार मनानें प्रार्थना केल्यामुळें श्रावक श्राविकांचें मन प्रसन्न होत असेल तर! त्यांचें ज्ञानतंतू प्रोत्साहित व कार्यप्रवण होत असतील तर त्यांनीं तेथें जाऊं नये का? तुम्ही नका जाऊं, पण तुमचा त्यांना विरोध कां?

तुम्ही धूम्रपान करून प्रसन्न रहा, ते मंदिरांत जाऊन प्रसन्न होतील.

हें ऐकून प्राध्यापक मोकळेपणानें म्हणाले 'शास्त्रीजी, तुमचें म्हणणें बरोबर आहे. माझाच दृष्टिकोन चुकीचा होता. कदाचित् मी धूम्रपान सोडूं शकणार नाहीं, पण त्या रोज लगबगीनें मंदिरांत जाणाऱ्यांबद्दल मनांत किंतु बाळगणार नाहीं, त्यांना हीन लेखणार नाहीं.

शास्त्रीजींनी वरील किस्सा अगदीं सहजपणें सांगितला. त्यांत अहंकार नव्हता, 'जितं मया' या भावनेचा लवलेशही नव्हता. ही घटना म्हटली तर साधी, पण मानली तर फारच उद्बोधक. अहंकार सोडून इतरांच्या आचारविचारांकडे पहावें हा या संवादांतून निष्पन्न होणारा बोध मौलिक आहे.

सामान्यांच्या मनावर अहंकारानें निर्माण झालेली अविचाराची, अज्ञानाची जळमटें सज्जनांच्या सहवासानें सहज दूर होतात हें सत्य आहे.


## 'सद्धर्म' प्रकाशित पोथ्या...

सद्धर्मानें आजवर पुढील पोथ्या प्रसिद्ध केल्या आहेत. (किंमत प्रत्येकी रु. २)

१. 'गणेशचतुर्थी पूजाविधि'
२. 'सुलभ संध्या आणि पूजाविधि'
३. 'श्री सत्यनारायण पूजाविधि'
४. 'श्री हरितालिका पूजाविधि'
५. 'श्री सत्यनारायण कथा'
६. 'बाळूनिश्चय' (साखरपुडा)
७. 'मंगळागौरी पूजाविधि'
८. 'मंत्रपुष्पांजलि मंत्राः'

या पोथ्यांचें वैशिष्ट्य हें आहे कीं त्यांत सर्व मंत्र व विधान संस्कृतमध्ये असून त्याचें सुस्पष्ट मराठी भाषांतरही दिलें आहे. त्यामुळें गुरुजींची मदत मिळण्यासारखी नसल्यास आपण स्वतःच पोथीवरून पूजा समग्रपणें करू शकतां.

देणगी मनीऑर्डरनें धाडण्याचा पत्ता—
**श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**
कापडाचे व्यापारी.
४८ प्रार्थना समाज नाका, गिरगांव, मुंबई ४

**सद्धर्म प्रकाशन कार्यालय**
९ कृष्णा सांघी पथ, मुंबई ४०० ००७

# सेवेसीं श्रुत होय

'सद्धर्माचा' एकविसाव्या वर्षाचा हा तिसरा अंक आमच्या सुहृद्वाचकांच्या हातीं देतांना आम्हाला आनंद वाटत आहे. येथवरच्या अंकांप्रमाणें हा ही अंक सर्वांना आवडेल अशी आमची मनोधारणा आहे. गेल्या एप्रिल महिन्यांत विशेषांक म्हणून, सुलभ भाषांतरासह 'पातंजल योगसूत्रांचें' पुस्तक प्रसिद्ध केलें. त्याचें आमच्या वाचकांनीं उत्स्फूर्त सक्रिय स्वागत केलें. अजूनही त्या पुस्तकाचें कौतुक करणारीं व प्रोत्साहन देणारीं पत्रें येत आहेत. गेलीं एकवीस वर्षें 'सद्धर्म' विशिष्ट ध्येय धोरणानें जीवननिष्ठ धर्म विषयक विचारांच्या प्रसाराचें कार्य यथाशक्ति, यथामति करीत आहे, तें लोकांच्या सदभिरुचीला रुचत आहे, याबद्दल आम्हीं स्वतःला कृतार्थ मानीत आहोत.

सद्धर्माची वार्षिक ऐच्छिक देणगी (वर्गणी) वाढवावी अशी आपलेपणाची व अगत्याची सूचना अनेक वाचकांकडून सतत केली जात आहे. सध्यां सर्वत्र वस्तूंच्या आकाशाला भिडणाऱ्या किमतींचा विचार करतां वरील सूचना रास्त आहे. परंतु सद्धर्माची असलेली 'किमान ऐच्छिक' देणगी शक्यतों आहे तीच ठेवावी असा आमचा मानस आहे.

आम्हीं देणगी (वर्गणी) वाढविली नाहीं तरी तिचें 'लाक्षणिक व ऐच्छिक' रूप लक्षांत घेऊन आमचे अनेक वाचक कोणी तीन रुपये तर कोणी पांच वा दहा रुपये पाठवीत असतात. कांहींनीं तर शंभर रुपयेही देणगी म्हणून पाठविले आहेत. अनेकांनीं, 'आवश्यकता असल्यास अवश्य कळवा, यथाशक्ति सहाय्य करूं' असें प्रोत्साहक आश्वासन दिलें आहे. देत आहेत. आम्हीं त्या सर्वांचे आभारी आहोत.

'अयाचितवृत्ति' हा सद्धर्माचा वारसा आहे. आणि त्याच बरोबर आप्त होऊन जो कोणी जें देईल तें अल्प असलें तरी 'बहु' मानून आनंदानें स्वीकारावें अशी वृत्ति आहे. तरीही प्रतिवर्षी दोन रुपये पाठविण्यांत होणारा खर्च, नोंद करण्याकरतां मोडणारा वेळ, पावत्यांचा व्याप व खर्च कमी होण्याच्या दृष्टीनें आमची अशी विनंति आहे—

वार्षिक देणगी म्हणून दोन रुपये पाठविणाऱ्या नव्यानें होणाऱ्या किंवा जुन्या ग्राहकांनीं किमान तीन वर्षांची देणगी (एकूण सहा रुपये) एकदम पाठवावी. जर 'पातंजल योग सूत्रां'चें पुस्तक हवें असेल तर त्या करतां अधिक दहा रुपये पाठवावे.

अधिक मागणें व सांगणें नाहीं. पूर्वी प्रमाणें सद्धर्मावर लोभ असों द्यावा, हे विनंति.

दादरला देणगी हातीं देण्याचा पत्ता :
**श्री गंगाधर प्रिंटिंग प्रेस**
वेस्टर्न रेल्वे फूटब्रिजच्या समोर
दादर, मुंबई ४०० ०२८

गिरगावांत देणगी हातीं देण्याचा पत्ता :
**श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**
कापडाचे व्यापारी
४८ प्रार्थनासमाज नाका, गिरगांव, मुंबई ४

संपादक : हरि जनार्दन दामले
प्रकाशक व मुद्रक : अनंत विनायक धोरे, ९ कृष्णा सांघी पथ, मुंबई ४०० ००७
मुद्रण स्थळ : मौज प्रिंटिंग ब्यूरो, गिरगांव, मुंबई ४०० ००४



१. केशव



२. नारायण



३. माधव



४. गोविंद



५. विष्णु



६. मधुसूदन



७. त्रिविक्रम



८. वामन



९. श्रीधर



१०. हृषीकेश



११. पद्मनाभ



१२. दामोदर



१३. संकर्षण



१४. वासुदेव



१५. प्रद्युम्न



१६. अनिरुद्ध



१७. पुरुषोत्तम



१८. अधोक्षज



१९. नारसिंह



२०. अच्युत



२१. जनार्दन



२२. उपेंद्र



२३. हरी



२४. श्रीकृष्ण